RNI No. MAHBIL /2009/31732
Reg. No. MCS/172/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ४, अंक १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १८-२४, २०१८/पौष २८-माघ ४, शके १९३९ [पृष्ठे ४
[किंमत : रुपये ९.००]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

### अधिसूचना

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्रमांक का. ४/प्र.क्र. ७३३/२०१५.—नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे. याच्या कलम ६९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (त्र) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, उक्त अधिनियमाच्या कलम ६९ च्या पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या पूर्वमान्यतेने, पुढील नियम करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना महाराष्ट्र नोंदणी (दस्त नोंदणीसाठी ओळख पडताळणी) नियम, २०१८ असे म्हणावे.

(२) हे नियम, नोंदणी महानिरीक्षक वेळोवेळी अधिसूचित करतील त्याप्रमाणे अशी दुय्यम निबंधक कार्यालये किंवा इतर नोंदणी कार्यालये यांना लागू असतील.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " अधिनियम " याचा अर्थ, नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) असा आहे ;

(२) " आधार क्रमांक " याचा अर्थ, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने, (युआयडीएआय) एखाद्या व्यक्तीसाठी, त्या व्यक्तीशी संबंधित डेमोग्राफिक आणि बायोमॅट्रीक माहितीची दुबारता काढून टाकल्यानंतर, तयार केलेला आणि दिलेला बारा अंकी ओळख क्रमांक, असा आहे ;

(३) " संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवा " याचा अर्थ, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (युआयडीएआय) किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या संस्थांनी, एखाद्या व्यक्तीची बायोमॅट्रीक माहिती, तिच्या विनंतीवरून किंवा संमतीने प्राधिकरणाकडील मध्यवर्ती सर्व्हरवर उपलब्ध असलेल्या माहितीशी ताडून पाहिल्यानंतर केलेले इलेक्ट्रॉनिकरीत्या प्रमाणीकरण असा आहे; आणि त्यामध्ये होय/नाही अशा प्रतिसादाचा किंवा त्या व्यक्तीच्या डेमोग्राफिक माहितीचा व छायाचित्राचा अंतर्भाव असलेल्या प्रतिसादाचा समावेश होतो.

(४) " युआयडीएआय " याचा अर्थ, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, असा आहे ;

**३. संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेची वैधता.**—अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये दस्त नोंदणीसाठी योग्य नोंदणी कार्यालयात कोणताही दस्तऐवज सादर करणाऱ्या किंवा कलम ३४ च्या प्रयोजनार्थ दुय्यम निबंधकांसमोर उपस्थित राहणाऱ्या किंवा अधिनियमाच्या कलम ३५ च्या पोट-कलम (२) नुसार पडताळणी केल्या जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अधिनियमातील त्या संबंधित कलमातील आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी या नियमांनुसार संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेची सुविधा वापरता येईल.

**४. कार्यपद्धती.**—ज्या ठिकाणी संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेचा पर्याय वापरण्यात येत असेल त्या ठिकाणी, नोंदणी अधिकाऱ्याद्वारे पुढील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल :—

(क) संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेचा वापर करण्यासाठी, अशा संबंधित व्यक्तीकडून एकतर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा कागदावर निसंदिग्ध सहमती प्राप्त करून घेण्यात येईल ;

(ख) अशी सहमती मिळाल्यानंतर, त्या संबंधित व्यक्तीचा बोटांच्या ठशांची स्कॅन प्रतिमा किंवा डोळ्यांच्या बाहुलीची प्रतिमा यासह बारा अंकी आधार क्रमांक नोंदणी संगणक आज्ञावलीद्वारे युआयडीएआय प्रणालीमध्ये प्रविष्ट करण्यात येईल. या नियमांच्या प्रयोजनार्थ एखाद्या व्यक्तीचे एकतर बोटांचे ठसे किंवा डोळ्यांच्या बाहुलीची प्रतिमा जुळणे पुरेसे असेल ;

(ग) प्रमाणीकरण झाल्यानंतर, युआयडीएआय प्रणाली आपोआप, संबंधित व्यक्तीचा किंवा वापरकर्त्याचा संमती आधारित आधार प्रमाणीकरण डेटा परत करील ;

(घ) नोंदणी संगणक आज्ञावलीद्वारे निर्माण होणाऱ्या गोषवारा अहवालामध्ये, त्या प्रमाणीकरणासाठीच्या विशिष्ट व्यवहार कोडसह, संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेद्वारे निर्माण झालेली माहिती मुद्रीत करण्यात येईल आणि विशिष्ट व्यवहार कोडसह, हा गोषवारा अहवाल सुयोग्य इलेक्ट्रॉनिक नमुन्यातदेखील संचयित करण्यात येईल.

**५. नोंदणी अधिकाऱ्याचे तपासणी करण्याचे अधिकार.**—या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) दस्ताच्या निष्पादनाचा कबुलीजबाब देण्यासाठी उपस्थित रहाणाऱ्या पक्षकाराच्या बाबतीत, त्याची ओळख संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेद्वारे पडताळण्यात आलेली असेल तर, उक्त पक्षकाराच्या ओळखीबाबत स्वतःची खात्री पटविण्याकरिता नोंदणी अधिकारी इतर कोणत्याही व्यक्तीची तपासणी करणार नाही ;

(ख) अन्य कोणत्याही प्रकरणांमध्ये पक्षकाराच्या ओळखीबाबत व्यक्तीच्या स्वतःची खात्री पटवण्यासाठी, नोंदणी अधिकाऱ्यास ज्या व्यक्तींची ओळख संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेद्वारे पडताळणी करण्यात आली आहे अशा व्यक्तींची तपासणी करता येईल तसेच युआयडीएआय प्रणालीकडूनदेखील त्या व्यक्तींची ओळख पडताळणी करता येईल.

**६. निष्पादकाच्या ओळख पडताळणीच्या आवश्यकतेची पूर्तता.**—उक्त अधिनियमाची कलमे ३४ आणि ३५ आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००० चा २१), प्रकरण दोन 'डीजीटल सिग्नेचर आणि इलेक्ट्रॉनिक सिग्नेचर' मधील कलम ४ आणि ६ नुसार अधिनियमाचे कलम ३४ चे पोट-कलम (३) मधील खंड (ख) व कलम ३५ चे पोट-कलम (२) याच्या प्रयोजनार्थ उक्त कलमान्वये संमती आधारित आधार प्रमाणीकरण सेवेद्वारे निर्माण केलेली माहिती, निष्पादकाच्या ओळख पडताळणीच्या आवश्यकतेची पूर्तता करीत आहे असे समजण्यात येईल.

**अनिल कवडे,**
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे,
दिनांक ६ जानेवारी २०१८.

**OFFICE OF THE INSPECTOR GENERAL OF REGISTRATION**

**MAHARASHTRA STATE, PUNE**

*NOTIFICATION*

Registration Act, 1908.

No. Desk. 4/CR-733/2015.—In exercise of the powers conferred under clase (*j*) of sub-section (*1*) of section 69 of the Registration Act, 1908 (XVI of 1908), in its application to the State of Maharashtra, the Inspector General of Registration, Maharashtra State, with the prior approval of the State Government, as required under sub-section (*2*) of section 69 of this Act, makes the following rules, namely :—

1. *Short title and application.*—

(*1*) These rules may be called Maharashtra Registration (Identity Verfication for the Registration of Documents), Rules, 2018.

(*2*) These rules shall apply to such Sub-Registrar offices or any other registration offices as may be notified by the Inspector General of Registration, from time to time.

2. *Definitions.*—In these rules unless the context otherwise requires,—

(*1*) ' Act ' means the Registration Act, 1908 (XVI of 1908) ;

(*2*) ' Aadhaar Number ' means a twelve digit unique identification number generated and issued to an individual by the Unique Identification Authority of Undia (UIDAI) after de-duplication of demographic and biometric information pertaining to the individual ;

(*3*) ' Consent based Aadhar Authentication Service ' means the electronic authentication carried out by the Unique Identification Authority of India (UIDAI) or agencies appointed by it, after matching the biometric information of an individual at his request or with his consent, with the information maintained by UIDAI in its own central servers, and includes a ' Yes/No ' response or a response containing the demographic information and photograph of the individual ;

(*4*) ' UIDAI ' means the Unique Identification Authority of India.

3. *Validity of Consent based Aadhaar Authentication Service*.—Any person presenting any document at the proper registration office for registration under section 32 of the Act or appearing before Sub-Registrar for the purpose of section 34 or being examined as per sub-section (*2*) of section 35 of the Act may utilize the facility of Consent based Aadhaar Authentication Service to fulfil requirements under the relevant sections of the Act in accordance with these rules.

4. *Procedure.*—Where the option of using the Consent based Aadhaar Authentication Service is utilized, the following procedure shall be adopted by the registering officer, namely :—

(*a*) The explicit consent of such person, either in electronic format or in paper format, for the use of the Consent based Aadhaar Authentication Service shall be obtained ;

(*b*) Upon granting of consent, the twelve digit Aadhaar number, along with the fingure print scan or iris of the person shall be entered into the UIDAI system through Registration software, Matching with either finger print or iris of a person shall be sufficient for the purpose of these rules.

(*c*) Upon authentication the system of UIDAI shall automatically, return the Consent based Aadhaar Authentication data of the person/user ;

(*d*) The information generated through Consent based Aadhaar Authentication Service along with the unique transaction code for that authentication shall be printed in the summery reports generated through the Registration software and the summery report along with the unique transaction code, shall also be stored in the appropriate electronic format.

5. *Power of Registering Officer to examine.*—Notwithstanding anything contained in these rules,—

(*a*) In case of the party appearing for admitting execution whose identity has been verified through Consent based Aadhaar Authentication Service the Registering Officer in order to satisfy himself about the identity of the said party, shall not examine any other persons ;

(*b*) In any other cases, the registering officer, in order to satisfy himself about the identity of party, may examine persons whose identity has been verified through Consent based Aadhaar Authentication Service and verify the same from the system of UIDAI.

6. *Fulfilment of requirement of Identification of executant.*—In accordance with sections 34 and 35 of the Act read with section 4 and 6 of Chapter II ' Digital Signature and Electronic Signature ', of the information technology Act, 2000 (XXI of 2000), the information generated through Consent based Aadhaar Authentication Service, the purpose of clause (b) of sub-section (3) of section 34 and sub-section (*2*) of section 35 shall be deemed to fulfil the requirements of identification of the executant under the said section.

ANIL KAWDE,
Inspector General of Registration,
State of Maharashtra.

Pune,

Dated 6th January 2018.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.